# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक ०६.०९.२०२६ रविवार**

**मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी मारबत उत्सवानिमीत्त केली मिरवणुक मार्गाची पाहणी :**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी तान्हा पोळा निमीत्त दिनांक ११.०९.२०२६ रोजी आयोजीत, ऐतिहासिक परंपरा व नागपुरची सास्कृतिक ओळख असलेल्या पिवळी—काळी मारबत व बडगा उत्सव मिरवणुक संबंधाने मिरवणुक मार्गाची आज दिनांक ०६.०९.२०२६ चे १२.०० वा. ते १३.३० वा. चे दरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने, बंदोबस्ताचे नियोजन संबंधाने पाहणी केली. मिरवणुकीचा मार्ग पोलीस ठाणे तहसील, पाचपावली, लकडगंज, कोतवाली व गणेशपेठ हद्दीतुन असल्याने मिरणुकीचे मार्गावरील गल्लीबोळ व गर्दीची ठिकाणांची रुटमार्च करुन पाहणी केली तसेच मिरवणुक मार्गावरील सुरक्षा व्यवस्था, गर्दीचे नियोजन, वाहतुक व्यवस्था व पोलीस बंदोबस्त संबंधाने आढावा घेतला. मा. पोलीस आयुक्त यांनी रुटमार्च दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये व कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता पोलीसांनी घ्यावयाच्या विशेष खबरदारीबाबत सुचना दिल्या. मा. आयुक्त यांनी मिरवणुक मार्गावर आवश्यकतेनुसार अतिरिक्त बंदोबस्त, वाहतुक नियंत्रण तसेच सीसीटिव्ही व तांत्रिक माध्यमांद्वारे निगरानी ठेवणार असल्याचे सांगितले. मारबत मिरवणुक शांततेत, सुरक्षिततेत व उत्साहपुर्ण वातावरणात पार पाडण्याकरीता पोलीस प्रशासन पुर्णपणे सज्ज असुन नागरिकांनीही पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन केले.

मिरवणुक मार्ग पाहणीवेळी मा. महापौर श्रीमती निता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्षा श्रीमती शिवानी दाणी वखरे, मनपा आयुक्त श्री विपीन इटनकर, मा. सहपोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर विभाग श्रीमती विनीता शाहु, पोलीस उपआयुक्त श्री राहुल माकणीकर, श्री संदीप पखाले, तसेच मिरवणुक मार्गावरील पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अधिकारी व अंमलदार तसेच नगरसेवक श्री हेमंत बरडे, मारबत समितीचे पदाधिकारी व सदस्य हजर होते.





**(कामगिरी)**

**नंदनवन पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीला १२ तासाचे आत अटक. ०२ गुन्हे उघडकीस**

दिनांक ०५.०९.२०२६ चे १९.३० वा. ते सुमारास, फिर्यादी लोकेश भाऊराव मडावी वय २२ वर्षे रा. मिचगाव पो. दुधमळा, ता. धानोरा, जि. गडचिरोली ह.मु. संघर्षनगर चौक, काच कंपनीजवळ, नागपूर हे त्यांचे भावासोबत दुरुस्तीकरीता दिलेली दुचाकी गाडी घेण्याकरीता संघर्षनगर चौक, दारुभट्टीसमोरुन जात असता, एका विना नंबरचे स्प्लेंडर मोटार सायकलवरुन आलेल्या तीन अनोळखी मुलांपैकी एकाने फिर्यादीस व इतर दोघांनी

त्यांचे भावास चाकुचा धाक दाखवून धमकी देऊन फिर्यादीचे खिशातील १५०/— रु जबरीने हिसकावून पळून गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३५१(३),३११,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात नंदनवन पोलीसांचे बिट मार्शल अंमलदार यांनी त्वरीत दखल घेवुन, घटनास्थळी भेट दिली व विचारपुस केली असता, विनानंबरचे मोटारसायकलवर कुणाल वानखेडे नावाचा मुलगा हा त्याचे इतर दोन साथीदारांसोबत सकाळी भट्टीसमोर येऊन लोकांना धमकावुन पैसे मागत असल्याचे निष्पन्न झाले. पोलीसांनी मिळालेल्या माहितीवरुन, आरोपींना निष्पन्न करून, सापळा रचुन संघर्षनगर चौक येथील एका पानटपरीजवळून आरोपी कुणाल भैयालाल वानखेडे वय १९ वर्षे, रा. सुरज नगर, कचरा डम्पींगजवळ, वाठोडा नागपुर व त्याचे दोन विधीसंघर्षग्रस्त बालक साथीदारांना ताब्यात घेवुन त्यांना विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. तसेच आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी वरील गुन्हयाव्यतिरिक्त त्याच ठिकाणी १५.०० वा. चे सुमारास एका इसमाकडून जबरीने मोबाईल फोन व रोख रक्कम हिसकावून घेऊन मारहाण केल्याची कबुली दिली. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे ताब्यातुन दोन्ही गुन्हयांतील रोख १९०/—रू., गुन्हयातील चोरी केलेला मोबाईल फोन व इतर एक असे ०२ मोबाईल फोन, ०३ लोखंडी चाकु व विनानंबरची स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण ३२,०९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी कुणाल वानखेडे यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. कैलाश देशमाने, पोअं. मनोज ढोले, विजय बावणे, कार्तिक लालसरे, योगेंद्र वालोंदे यांनी केली.




**<u>(गुन्हे)</u>**

**<u>पोलीस ठाणे शांतीनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०५.०९.२०२६ चे ०९.३० वा. ते दि. ०६.०९.२०२६ चे ०६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत घर क्र. २९५, लालगंज खैरीपुरा, एकनाथ सावजी भोजनालयाजवळ राहणारे फिर्यादी गुलशन दिलीप दांडेकर वय २४ वर्षे यांची आजी मरण पावल्याने ते आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह हिवरीनगर येथे भावाकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडून, आत प्रवेश करुन, घरातील लोखंडी आलमारीतील लॉकरमधील रोख ३,२२,०००/— रु. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकूण ४,८०,०००/— रु. चा मुद्येमाल चोरुन नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे पोउपनि. अमित कुंभार यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सक्करदरा :–** दिनांक ०४.०९.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, योगेश्वर नगर, दिघोरी येथे राहणाऱ्या श्रीमती लक्ष्मीबाई श्रीकांत पांडे वय ६८ वर्ष हया त्यांचा मुलगा योगेश पांडे वय ३५ वर्ष याचेसोबत दुचाकीवर मागे बसून दिघोरी चौकातुन सक्करदराकडे जात असता, पंचवटी आश्रम जवळील रोडवरील स्पीड ब्रेकरवर गाडी उसळल्याने त्यांचा तोल जाऊन त्या मागील सीटवरुन खाली पडून गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०५.०९.२०२६ चे ०३.१५ वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**